ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक
जागेवरील अतिक्रमणे हटविणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
परिपत्रक क्र. व्हीपीएम २६९३/के. नं. ४२०४/२२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक:- ५ जानेवारी १९९३.

प रि प त्र क

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५२ मधील तरतुदीनुसार, पंचायत क्षेत्रात इमारत बांधकामास परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना आहेत. ग्रामपंचायतींच्या परवानगीशिवाय गावाच्या सीमेतील कोणत्याही सार्वजनिक जागेवरील/रस्त्यांवर अतिक्रमण झालेले असल्याचे आढळून आल्यास, ते काढून टाकण्याचे अधिकार वरील अधिनियमाच्या कलम ५३ [२] अन्वये ग्रामपंचायतींना आहेत. अशा प्रकारचे अतिक्रमण ग्रामपंचायतींना काढणे शक्य न झाल्यास, कलम ५३[२-अ] मधील तरतुदीनुसार, जिल्हाधिकारी यांना अशी अतिक्रमणे हटविणेसंबंधीची कार्यवाही करता येणे शक्य आहे.

वरील अधिनियमातील तरतूद विचारांत घेऊन, सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही वस्तुस्थिती त्यांच्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निदर्शनास आणून देऊन, गावाच्या सीमेतील सार्वजनिक जागेवर झालेल्या अतिक्रमणांवर अधिनियमातील तरतुदीनुसार जरूर ती कार्यवाही त्वरेने करणेबाबत ग्रामपंचायतींना सूचना द्याव्यात. सदर अतिक्रमणे हटविणेसंबंधीची कार्यवाही करता येणे ग्रामपंचायतींना शक्य न झाल्यास, ग्रामपंचायतींना ही बाब ठरावान्वये जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी. जिल्हाधिकारी यांनी अशी अतिक्रमणे वरील अधिनियमाच्या कलम ५३ [२-अ] मधील तरतुदीनुसार, स्वत: होऊन किंवा ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेल्या अर्जावरून, हटविणेसंबंधीची आवश्यक ती पुढील कार्यवाही त्वरेने करावी. सदर तरतुदीची परिणामकारकरित्या अंमलबजावणी होईल अशी व्यवस्था व दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अ. क. जगताप
५/१/९३
[ अ. क. जगताप ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

जिल्हाधिकारी कार्यालय,
सातारा
29 JAN 1993
शाखा
प्र. लि. लि. ज. लि. जिल्हाधिकारी

प्रति,
१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,